महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ५२ /२०२४ दि. २२/०३/२०२४

## –:वाहतूक नियंत्रण अधिसुचना:–

**ज्याअर्थी**, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका अंतर्गत भिवंडी वाहतूक उप विभागातील एस टी स्टॅण्ड समोर ३०० मी.मी. व्यासाची जलवाहिनी फुटलेली असुन त्यामुळे भिवंडीतील काही भागांमध्ये पाणी टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. सध्या रमजान महिना सुरू असल्याने सदर जलवाहिनी दुरूस्त करून घेणे आवश्यक आहे. सदर परिसरात वाहतुकीची कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद :–** १) मुंबई/ठाणे/मानकोली कडून जुना ठाणे आग्रा रोडने भिवंडी शहराकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना अंजूरफाटा या ठिकाणी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने अंजूरफाटा मार्गे मानकोली नाका कडून नाशिक हायवेने वाडा कडे तसेच पुढे इच्छीत स्थळी जातील.

**प्रवेश बंद :–** २) रांजनोली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड – अवजड वाहनांना रांजनोली नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने रांजनोली नाका येथून सरळ मुंबई नाशिक बायपास हायवेवरील वडपा चौकी येथून चाविंद्रा मार्गे वाडा कडे इच्छित स्थळी जातील

**प्रवेश बंद :–** ३) वाडा रोडने नदिनाका मार्गे भिवंडी शहराकडे येणाऱ्या जड अवजड वाहनांना वंजारपट्टी नाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :–** सदरची वाहने वंजारपट्टी ब्रिजवरून चाविंद्रा मार्गे नाशिक कडे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतुक अधिसुचना दि. २२/०३/२०२४ रोजी रात्रौ २२:०० ते २३/०३/२०२४ रोजी सकाळी ०५:०० वाजेपावेतो अंमलात राहिल.

सदरची अधिसुचना ही पोलीस वाहने, फायरब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडॉर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील व सदर कामातील वाहनांना लागु होणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामिण.
मा. आयुक्त, भिवंडी निजामपुरा शहर महानगरपालिका, भिवंडी/बृहन्मुंबई
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा. ठाणे.

CS CamScanner

**प्रत कार्यवाहीसाठी :—**
प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
नियंत्रण कक्ष अधिकारी, भिवंडी/ठाणे.

**प्रत :—** पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत :—** समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/— सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत :—** सपोआ वाहतूक विभाग, भिवंडी व पो.निरी. भिवंडी, नारपोली, कोनगांव वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner